# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी ठाणे यांचे कार्यालय

(रेतीगट शाखा)

**४ था मजला, कोर्ट नाका, ठाणे (प.) – ४००६०१**

दुरध्वनी क्र.०२२-२५३४३६३६ ई-मेल – retigat.thane@gmail.com

---

## ई-निविदेसह ई-लिलाव सूचना

**सन २०१६-१७ करीता दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंतच्या मुदतीसाठी रेती/वाळू तृतीय फेरलिलाव (द्वितीय फेरी)**

**यांत्रिक साधनाद्वारे वाळू / रेती उत्खननासाठी राखीव गटांकरीता दिनांक ३० सप्टेंबर,२०१७ पर्यंतच्या मुदतीसाठी ई निविदासह ई-लिलाव (सन २०१६-१७)**

**सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २१ मे, २०१५ अन्वये निश्चित केलेले धोरण**

ठाणे जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी व कल्याण या तालुक्यातील खाडीमधील यांत्रिक साधनांद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या सोबतचे प्रपत्र-अ मध्ये नमुद केलेल्या ३ रेतीगटांच्या (१० रेती उपगटांच्या) निर्गतीसाठी ई-निविदेसह ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येणार असून सदर प्रक्रिया सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक २१ मे, २०१५ अन्वये महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडील सी.आर.झेड. विषयक अनुमती, शासन पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील प्राधिकार पत्र क्र.ममेबो/मुकाअ/जआ/टी-९७x/उत्खनन-ठाणे/२०१६-१७/६४९ दि.०६.१०.२०१६ व सर्व्हेक्षण अहवालामधील अटी व शर्तीस अधिन राहून तसेच शासन, महसूल व वनविभागाकडील पत्र क्रमांक गौखनि-१०/०२१७/प्र.क्र.९२/ख, दिनांक ०९/०३/२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेने तृतीय फेरलिलावाची द्वितीय फेरी राबविण्यात येणार आहे.

१. ई-निविदेसह ई-लिलाव प्रक्रियेसाठी ICICI बँक व ABC Procure,अहमदाबाद यांची नियुक्ती करणेत आली आहे.
२. या लिलावाच्या प्रक्रियेसंबंधी सर्व माहिती, वाळू/रेती उत्खननासंबंधी अटी व शर्ती यांची सविस्तर माहिती https://eauctioncolltha.abcprocure.com या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
३. सदर रेतीगटांचे रेती ई-निविदासह ई-लिलाव, प्रथम फेरलिलाव, द्वितीय फेरलिलाव व तृतीय फेरलिलाव आयोजित करुन याबाबत जिल्हा स्तरावर प्रसिद्ध होणा-या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. परंतु दिलेल्या मुदतीअखेर एकाही व्यक्ती/संस्थेने Online Registration केलेले नाही. त्यामुळे लिलाव प्रक्रिया यशस्वी होऊ शकली नाही. यास्तव तृतीय फेरलिलावाची द्वितीय फेरी राबविणेत येणार आहे.